# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०९.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०८.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ५,५१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करुन १,५२००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०७८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,१४,५५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०८.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०९ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०८.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक ०८.०८.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र. १५२, जय दुर्गा सोसायटी, मनिषगनर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी तुषार दर्शन वाधवा वय ३६ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह पंजाब येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ६०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ९,१०,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. नितेश टेमगिरे ९६८९५८४८३० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे इमामवाडा :—** दिनांक ०८.०८.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, राजाबाक्षा मैदान, सिमेंट ओटयावर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबंत, उंची—५

फुट ७ इंच, अंगात पांढरे रंगाचे रेघाटीचा शर्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे इमामवाडा येथे संपर्क साधावा.

यាप्रकरणी फिर्यादी राजेश गेंदलाल उपारकर वय ४७ वर्ष रा. प्लॉट क्र. ८, विश्वर्मा नगर, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. प्रविण लाखनकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे खापरखेडा</u> :—** दिनांक ०८.०८.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत भानेगाव शिवार, कन्हान नदीचे पात्रात कन्व्हेंटर बेल्टचे पिलरजवळ, किनाऱ्यावर एका अनोळखी अंदाजे ३५ ते ४० वर्ष वयाच्या इसमाचा मृतदेह पाण्यात तरंगतांना मिळुन आल्याने पाण्याबाहेर काढुन पुढील कार्यवाही करीता मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आला आहे. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. अजिंक्य कदम ७८४१०७०६६० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे वाडी</u> :—** पोलीस ठाणे वाडी हद्दीत गणेशनगर झोपडपट्टी, आठवा मैल येथील मोकळया जागेत फिर्यादीचे वडील नारायण गोविंदराव सावंत वय ६० वर्ष हे तंबु बांधुन त्यामध्ये राहत होते. दिनांक ०४. ०८.२०२६ चे ०१.१५ वा. चे सुमारास, त्यांना कोणत्यातरी विषारी सापाने चावा घेतल्याने, त्यांची प्रकृति खराब झाल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०८.०८. २०२६ चे १६.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी मच्छिंद्र नारायण सावत वय ३० वर्ष रा. शिंदोडा, ता. तिवसा, जि. अमरावती ह.मु. आठवा मैल, वाडी यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. ज्ञानेश्वर सानप यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | मा.१५वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०२०८ /१९९६ | कलम ३२५ भादंवि | १) शिवपुजन किसनदेव प्रसाद २) सलिम शाह लाल मोहम्मद दोन्ही रा. स्मॉल फॅक्ट्री एरीया, महाराष्ट्र रोलींग मिल, लकडगंज, नागपूर. | २०.०८.२०२६ |
| **२.** | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | १०२०८ /२०१७ | कलम ४,५ मजुका | लोकेश व्यंकटी देवगडे रा. टिमकी, पिल्लु पांडे मंदीरसमोर, लकडगंज, नागपूर | २०.०८.२०२६ |
| **३** | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०००१ /२००२ | कलम ४०७, ४६८,४७१, ३४ भादंवि | १) मोहम्मद यासीन अब्दुल रज्जाक वय ४३ वर्ष रा. क्वॉलिटी इमारत, सुपर कॅन्टीनचे वर, गांजाखेत चौक, नागपूर | २४.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २) शेख परवेज शेख बब्बु वय २२ वर्ष रा. नमक कारखाना जवळ, गांजाखेत चौक, नागपूर<br>३) शमीम अहमद जमालुद्दीन वय ४१ वर्ष रा. जामा मस्जिद जवळ, मोमीनपुरा, नागपूर | |
| ४ | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०२२०५ /२०१२ | कलम ३७९,४११, ३४ भादंवि | १) राजेश सत्यजीत शाहु रा. गौरीशंकर नगर, नागपूर<br>२) विक्की उर्फ अजय राममुरत गुप्ता रा. वृंदावन नगर, फुकट नगर, नागपूर<br>३) संतोषकुमार मुन्नाप्रसाद शाहु रा. वृंदावन नगर, पाच देऊळ, शाहु मोहल्ला, नागपूर | २४.०८.२०२६ |
| ५ | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०१७६ /२००४ | कलम ३७९ भादंवि | सलिम खान हमिद खान रा. मोठा ताजबाग दर्गाहजवळ, सक्करदरा, नागपूर | २४.०८.२०२६ |
| ६ | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४१९७ /२००७ | कलम ४,२५ भाहका | मोहम्मद आरिफ मोहम्मद खलिल वय २३ वर्ष रा. बिबी कॉलनी, खड्डा कंपनीमागे, कामठी, नागपूर | २४.०८.२०२६ |
| ७ | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०२६७ /२००३ | कलम ३७९,४११, ३४ भाहका | १) राजु कल्याणदास उदासी रा. फ्लॅट क्र. १२६५, महालक्ष्मी अपार्टमेंट, वैशाली नगर, पाचपावली, नागपूर.<br>२) राकेश पुनितराम यादव रा. भांडेवाडी रोड, प्लॉट क्र. २३०, सुरजनगर, दुर्गा मंदीरजवळ, नागपूर | २४.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**